पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३


सुविचार - आयुष्यात धैर्य हे सर्वात मोठे गुण आहे. धैर्य आणि संयम ठेवून, आपण कोणत्याही समस्येवर मात करू शकता.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७३,५२४.२६ | -७१९.०८ -०.९७% |
| डॉलर | ₹ ९५.४४ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४० | २७ |
| दिल्ली | ४३ | ३१ |
| मुंबई | ३६ | २९ |
| नागपूर | ४० | २९ |
| पुणे | ३४ | २५ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. ९ जून २०२६ | वर्ष २ रे | अंक २०८ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४६ संध्या-७:०८

सोने – चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४९,५००/- २,४०,०००/-
Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# महाराष्ट्र रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारा

## महारेलच्या ६५ कामांना मान्यताप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

वृत्तसंस्था । मुंबई

**अनेक वर्षांनंतर रेल्वे फाटक समस्या कायम आहे. यामुळे अनेक लोकांचे जीव गेले आहेत. त्यासाठी राज्यातील रेल्वे फाटक जवळ त्वरित पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**



महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (महारेल) करण्यात येणाऱ्या एकूण १३१ पैकी पहिल्या टप्प्यात ६५ कामांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महारेलच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

सह्याद्री अतिथिगृहात ही बैठक झाली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आमदार प्रसाद लाड बैठकीस उपस्थित होते. राज्यातील सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील (अंडर पास) रस्त्याची कामे महारेलमार्फत करण्यात येणार आहेत. त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध निर्देश दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्रात एकही रेल्वे मार्गावर फाटक राहता काम नये. रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्रासाठी रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात; (पान २ वर)

### प्रस्तावित रेल्वे पायाभूत सुविधांची कामे

**मुंबई महानगर क्षेत्र- १७, पुणे शहर- १५, नागपूर- १३, नाशिक- ५, अमरावती- ५, सांगली- ४, छत्रपती संभाजीनगर- ३, कोल्हापूर- ३, धुळे- ३, लातूर- ३, परभणी- ३, सोलापूर- २, जळगाव- २, अहिल्यानगर- १ आणि नांदेड शहरात- १. एकूण- ८०.**

# बऱ्हाणपूर बाजार समितीत केळीला ३५०० रुपये प्रतिक्विंटलपेक्षा अधिक दर



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यासह मध्य प्रदेशातील सीमावर्ती भागांत अलीकडेच झालेल्या नैसर्गिक आपत्तीचा फटका केळी उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर बसला आहे.**

हजारो हेक्टरवरील केळी बागांचे नुकसान झाल्याने बाजारात केळीची आवक अचानक घटली असून, त्याचा थेट परिणाम दरवाढीच्या रूपाने दिसून येत आहे. बऱ्हाणपूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मंगळवारसाठीही केळीला कमाल ३५०० रुपये प्रति क्विंटलपेक्षा अधिक दर जाहीर झाला आहे. यापार्श्वभूमीवर, आणखी किती दर वाढणार त्याकडे आता केळी उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

केळीच्या उत्पादन खर्चात रोपांसह खते, फवारणी, मजुरी, सिंचन प्रणालीमुळे आधीच भरमसाठ वाढ झाली आहे. त्यात हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतकरी आणखी आर्थिक दबावाखाली आले (पान २ वर)

## थोडक्यात



### विमानाचा भीषण अपघात उड्डाणाच्या वेळी जेट जळून खाक

रोंजो । डोमिनिकन रिपब्लिकमधील ला रोमाना आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी एका खाजगी जेट विमानाचा भीषण अपघात झाला. उड्डाणासाठी धावपट्टीवर वेग घेत असतानाच विमानावरील नियंत्रण सुटले आणि काही क्षणांतच ते आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या दुर्घटनेत विमानातील मुख्य वैमानिक आणि सह-वैमानिक अशा दोघांचा जागीच मृत्यू झाला.

### देवस्थान जमिनींवरील अतिक्रमणांना बसणार चाप

मुंबई । राज्यातील देवस्थानांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या मालकीच्या जमिनींवरील अतिक्रमणे दूर करण्यासाठी नियोजित महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम, २०२६ च्या सध्याच्या प्रारूपाला स्थगिती देऊन, सुधारित प्रारूप करण्यासाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. नागरिकांना व देवस्थानांना या सुधारित प्रारूपावर १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात आपल्या हरकती नोंदवता येतील.

# टीएमसीच्या २० नाराज खासदारांनी स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्याची केली मागणी

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेस (टीएमसी) पक्षातील अंतर्गत कलह अधिक तीव्र होत असल्याचे चित्र समोर आले आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांपैकी एक असलेले राज्यसभा खासदार सुखेंदु शेखर रॉय यांनी सोमवारी अचानक पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह राज्यसभा सदस्यपदाचाही राजीनामा दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्यानंतर टीएमसीमधील बंडखोर खासदारांनी लोकसभा अध्यक्षांकडे स्वतंत्र संसदीय गटाला मान्यता देण्याची मागणी केल्याची माहिती समोर आली आहे.**



सूत्रांच्या माहितीनुसार, टीएमसीच्या सुमारे २० नाराज खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र देत स्वतंत्र संसदीय गट (ब्लॉक) म्हणून मान्यता देण्याची तसेच लोकसभेत स्वतंत्र आसनव्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी (पान २ वर)

### पक्षातील मतभेद उघडपणे समोर

यापूर्वीही टीएमसीला विधानसभा स्तरावर मोठा धक्का बसला होता. पक्षाच्या ५८ आमदारांनी पक्ष नेतृत्वाविरोधात बंडाचे संकेत देत विरोधी पक्षनेतेपदासाठी ऋतब्रत बॅनर्जी यांना पाठिंबा दिला होता. अधिकृत उमेदवार शोभनदेव चट्टोपाध्याय यांना नाकारल्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी ऋतब्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिली होती. या घडामोडींमुळे निवडणुकीतील पराभवानंतर पक्षातील मतभेद उघडपणे समोर आले होते.

# आठवड्याच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजार गडगडला

## सेन्सेक्स ८०० पेक्षा जास्त तर निफ्टीही २८६ अंकांनी घसरला

वृत्तसंस्था । मुंबई

**भारतीय शेअर बाजारातील व्यवहारांची सुरुवात आज आठवड्याच्या पहिल्या दिवशी मोठ्या घसरणीने झाली. ३० शेअर्सचा निर्देशांक असलेला बीएसई सेन्सेक्स ८२१ अंकांनी घसरून ७३,४२१ वर उघडला.**



दरम्यान, एनएसई निफ्टी ५०,२८६ अंकांनी घसरून २३,०८० वर उघडला. सेन्सेक्समधील सर्व शेअर्स सध्या घसरणीत आहेत. केवळ लार्जकॅपच नव्हे, तर स्मॉलकॅप आणि मिडकॅप शेअर्समध्येही मोठी विक्री होत आहे. निफ्टी मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक १.५% पेक्षा जास्त घसरणीसह व्यवहार करत आहेत.युद्धामुळे आज कच्च्या तेलाच्या किमतीने ८,६०० रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. आखाती देशांमधील संघर्षामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होण्याच्या भीतीने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या असून, त्याचा भारतीय (पान २ वर)


### आज शेअर बाजार का घसरला?

**इराणने इस्रायलवर केलेल्या ताज्या हल्ल्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. इराणच्या इस्रायलवरील क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे जागतिक भू-राजकीय तणाव वाढला आहे. ज्यामुळे गुंतवणूकदारांनी इक्विटीमधून निधी काढून घेतला आहे.**

# फिलीपिन्समध्ये भूकंपाचा विध्वंस

वृत्तसंस्था । मुंबई

**फिलीपिन्समध्ये आज सकाळी ७.८ तीव्रतेचा भूकंप झाला असल्याची माहिती समोर येत आहे. एका तासाच्या आत याठिकाणी तीन वेळा शक्तिशाली भूकंप झाले असल्याचे सांगण्यात येत आहे. या शक्तिशाली भूकंपाने लोकांना हादरवून सोडले.**



भूकंपामुळे झालेल्या विनाशकारी विध्वंसाचे व्हिडिओ समोर आले आहेत, ज्यात इमारतींचा ढिगारा झाल्याचे, कार्यालये आणि शाळांची भीषण अवस्था दिसत आहे. काही भागांमध्ये घरांच्या भिंती हादरल्या असून अनेकांचे संसार उघड्यावर आल्याचे वृत्त आहे. फिलीपिन्स इन्स्टिट्यूट ऑफ सिस्मॉलॉजी अँड व्होल्कॅनॉलॉजीने लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. संस्थेने म्हटले आहे की, भूकंपाचे आफ्टरशॉक्स (पुनर्धक्के) येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# होर्मुझ सामुद्रधुनीजवळ व्यावसायिक जहाजावर हल्ला?

## २४ भारतीय खलाशी अडकले, केली तातडीच्या मदतीची मागणी

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**युद्धविराम सुरु असताना इस्रायल-इराणमध्ये पुन्हा संघर्ष उफाळून आला आहे. दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ला केल्याची घटना उघडकीस आली. हा संघर्ष सुरु असतानाच २४ भारतीय खलाशी असणाऱ्या तेल जहाजाला अचानक आग लागल्याने खळबळ निर्माण झाली. सोमवारी दुपारी दीडच्या सुमारास ओमान समुद्रकिनाऱ्याजवळ ही घटना घडली. समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार, सर्व खलाशी सुखरुप आहेत.**

फॉरवर्ड सीमेन्स युनियन ऑफ इंडियाने एक्सवर केलेल्या पोस्टनुसार, ओमानच्या किनाऱ्याजवळ तेलवाहू मारीवेक्स जहाजावर २४ भारतीय खलाशी अडकून पडले. जहाजावर आग लागल्यानंतर युनियनकडून भारतीय प्रशासन आणि भारतीय नौदलाकडे मदत मागण्यात आली. या जहाजावरील या घटनेची अधिक माहिती या पोस्टमध्ये देण्यात आलेली नाही. शिवाय जहाजातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची देखील अधिक माहिती समोर आलेली नाही.






प्राथमिक माहितीनुसार, टँकरमध्ये कोणताही माल नव्हता. घटनेबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी जहाजबांधणी मंत्रालय, परराष्ट्र (पान २ वर)

**जहाजबांधणी मंत्रालयाचे संचालक ओपेश कुमार शर्मा यांनी या घटनेबाबत दिलेल्या माहितीनुसार, जहाजावरील आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. पण त्याचा तपास सुरू आहे.**

# केळी उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करा

## शरद पवारांची शासनाकडे मागणी

प्रतिनिधी । जळगाव

**उत्तर महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यांमुळे केळी बागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, संबंधित शेतकरी गंभीर संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्य सरकारकडून नुकसानग्रस्तांना तातडीने मदत करण्यासाठी पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. पवार यांच्या पाठपुराव्यानंतर नैसर्गिक आपत्तीमुळे हतबल झालेल्या केळी उत्पादकांना त्यामुळे दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

राज्यातील शेतकरी कर्जमाफीचा प्रश्न, अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यांमुळे झालेल्या शेती नुकसानीसह विविध कृषी विषयांवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी माध्यमांसमोर सविस्तर भूमिका मांडली. त्यात उत्तर महाराष्ट्रातील केळीसह उसाच्या नुकसानीकडे त्यांनी विशेषकरुन लक्ष वेधले. नाशिकसह जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यांतून पिकांच्या नुकसानीबाबत प्राथमिक अहवाल प्राप्त झाले आहेत. या अहवालांमध्ये विशेषतः केळी आणि ऊस पिकांचे मोठ्या



प्रमाणावर नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे. परिस्थितीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आणि नुकसानीचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी तज्ज्ञांचे स्वतंत्र पथक संबंधित भागात (पान २ वर)

# भारतीय संघाचा तिसऱ्याच दिवशी कसोटी सामन्यात विजय

वृत्तसंस्था । चंदीगड

**मुल्लांपूर (न्यू चंदीगड) येथील महाराजा यादविंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील एकमेव कसोटी सामना खेळला गेला. या सामन्यात भारतीय संघाने अफगाणिस्तानचा एक डाव आणि ३०० धावांनी दणदणीत पराभव करत एकतर्फी वर्चस्व गाजवलं आहे.**

अफगाणिस्तानचा पहिला डाव अवघ्या १५२ धावांवर संपुष्टात. भारताने पहिल्या डावात उभारलेल्या ४१२ धावांची भक्कम आघाडी मिळाली. त्यामुळे अफगाणिस्तानवर फॉलोऑनची नामुष्की ओढवली. दुसऱ्या डावातही अफगाण फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर टिकू शकले नाहीत. संपूर्ण संघ केवळ ११२ धावांत गारद झाला आणि भारताने सामना सहज खिशात घातला. या विजयाचा सर्वात मोठा शिल्पकार ठरला पदार्पणवीर मानव सुथार. आपल्या पहिल्याच कसोटीत त्याने प्रभावी गोलंदाजी करत अफगाणिस्तानच्या फलंदाजीची अक्षरशः दाणादाण उडवली.

## संपादकीय

### लोकशाही मूल्यांना ग्रहण

या निवडणुकीत महायुती व मविआ या दोहोंतील नाराजी, धुसफूस आणि बंडखोरी समोर आली होती. मात्र हातातील सत्तेच्या नाड्या व देवेंद्र फडणवीस यांचे राजकीय कौशल्य यामुळे सत्ताधाऱ्यांमधील धुसफूस विरून जाईल, हा राजकीय तज्ज्ञांचा अंदाज खरा ठरला. विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या १७ जागांच्या निवडणुकांत गुरुवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी महाविकास आघाडीच्या सात उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने सत्ताधाऱ्यांच्या सहा जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. या उमेदवार ङ्गबसवा–बसवीफमध्ये सत्ताधाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा चुराडा केल्याचा विरोधकांचा आरोप असला, तरी त्यांच्या पक्षातील निष्ठावंतांची काय गत आहे, हे त्यांनीही कधीतरी मान्य करायला हवे. राजकीय पक्षात वर्षानुवर्षे घालवल्यावर एखाद्यास विधानसभा किंवा विधान परिषदेची उमेदवारी मिळते. अशा वेळी हजारो कार्यकर्त्यांमधून निवडलेले उमेदवार पक्षश्रेष्ठींना विचारल्याशिवाय आपले उमेदवारी अर्ज मागे घेण्यामागे आर्थिक कारणे असोत वा राजकीय दबाव, याची जबाबदारी उमेदवारापेक्षा त्यांना उमेदवारी देणाऱ्या नेतृत्वावरच येते. त्यामुळेच या निवडणुकीत पैशांचा वापर झाला या विरोधकांच्या आरोपापेक्षा उद्धव ठाकरे, शरद पवार व हर्षवर्धन सपकाळ यांनी स्वतःच्या कार्यशैलीत काय सुधारणा करायला हव्यात, याचा देखील गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.महायुतीत १७ जागांपैकी भाजपला ११, शिवसेना शिंदे गटाला चार आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला दोन जागा असे वाटप झाले. यामुळे महायुतीतील असंतोष लपला नाही. दोनच जागा मिळाल्याने राष्ट्रवादीचे नेतृत्व अस्वस्थ झाले. मात्र सध्या राष्ट्रवादीचे नेतृत्व नक्की कोण करतेय हाच एक प्रश्न आहे.परभणीत पक्षाची ताकद असताना ती जागा सोडून सुनील तटकरेंच्या पुत्रासाठी रायगडची जागा पदरात पाडून घेणे, किंवा एका बिल्डरपुत्राला विधिमंडळात पोहोचवण्याचा पार्थ पवार यांचा हट्ट, तटकरेंना रायगड सोडून भागवून घेणे यातून पक्ष वाढवण्याची कोणती रणनीती आखली गेली, हे पक्षाच्या नेत्यांनाच माहीत! दुसरीकडे महाविकास आघाडीत काँग्रेस आठ, शिवसेना उद्धव गट सहा आणि राष्ट्रवादी शरद पवार गट तीन असे उत्साहात जागावाटप झाले; पण ठाणे, पुणे येथील राष्ट्रवादी (शप), वर्धा–चंद्रपूर–गडचिरोली व यवतमाळ, अहिल्यानगर येथील काँग्रेस, तसेच रायगड–रत्नागिरी–सिंधुदुर्ग व छत्रपती संभाजीनगर येथील शिवसेना (उबाठा) येथील उमेदवारांनी अर्ज मागे घेतले.ध्ये बाण व खान एकत्र येण्याच्या नव्या समीकरणाची सुरुवात झाल्याचे म्हणता येईल. संघटनात्मक पातळीवर डळमळीत झालेली काँग्रेस व अजित पवार यांच्या मृत्यूनंतर राष्ट्रवादीतील निर्नायकी यामुळे संभ्रमावस्थेतील मुस्लिम समाजाला सकारात्मक संदेश देण्याचे काम भाजपसोबत राहून एकनाथ शिंदे करत आहेत. त्याचा नफा–तोटा भविष्यातच समजेल. या निवडणुकीतील विरोधी उमेदवारांच्या अर्जमाघारीने होत असलेल्या आर्थिक उलाढालींच्या चर्चा शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राच्या राजकीय आरोग्यासाठी चिंताजनक आहेत. सगळ्याच पक्षांनी उमेदवार निवडताना कार्यकर्त्यांच्या योगदानापेक्षा श्रेष्ठींच्या मर्जीचा, नेत्यांच्या मुलांच्या राजकीय भवितव्याचा विचारच प्रामुख्याने केला. वर्षानुवर्षे पक्षासाठी राबलेल्या कार्यकर्त्याला डावलून पक्षाबाहेरून आलेल्यांना संधी दिली जात असल्याच्या तक्रारी भाजप कार्यकर्तेही आता दबक्या आवाजात करू लागले आहेत. विधान परिषदेत तज्ज्ञ, विद्वान आणि विविध क्षेत्रांचे प्रतिनिधित्व अपेक्षित असते.

# काकडदा जंगलात भीषण आगीत शेकडो सागवानांची झाडे जळून खाक

## वनविभागाचे दुर्लक्ष ; वन्यजीवांच्या अस्तित्वाला धोका

प्रतिनिधी । धडगाव

**तालुक्यातील काकडदा परिसरातील जंगलात मध्यरात्रीच्या सुमारास अचानक भीषण वणवा लागल्याची घटना घडली. या आगीत मौल्यवान अशा शेकडो सागवानाच्या झाडांची राखरांगोळी झाली असून, सातपुड्याचे नैसर्गिक वैभव आता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.**



वणवा विझवण्यात वन विभागाला पूर्णपणे अपयश आले असून, प्रशासनाच्या निष्काळजीपणाबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. सविस्तर वृत्त असे की, काकडदा परिसरातील घनदाट जंगलात मध्यरात्री अचानक आग भडकली. वाऱ्यामुळे पाहता पाहता या वणव्याने रौद्ररूप धारण केले आणि आगीचे लोळ आकाशात भिडू लागले. या जंगलात मोठ्याप्रमाणावर मौल्यवान सागवानाची आणि इतर औषधी झाडे आहेत. या भीषण आगीच्या भक्ष्यस्थानी पडून शेकडो झाडे जळून खाक झाली आहेत. सातपुड्याच्या पर्वतरांगांमध्ये गेल्या दोन–तीन महिन्यांपासून वणवा लागण्याच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ झाली आहे. दररोज कुठल्या ना कुठल्या डोंगररांगेवर आग लागलेली पाहायला मिळते. या सततच्या आगींमुळे केवळ मौल्यवान वनसंपदाच नष्ट होत नाहीये, तर येथील वन्य प्राण्यांचा नैसर्गिक अधिवासही पूर्णपणे धोक्यात आला आहे. अनेक लहान मोठे वन्यजीव, दुर्मिळ पक्षी आणि सरपटणारे प्राणी आगीत होरपळून मरत असल्याची भीती व्यक्त होत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी वन्यप्राणी आता मानवी वस्तीकडे धाव घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जंगलात सातत्याने आगी लागूनही वनविभाग मात्र ढिम्म असल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत आहे. वणवा रोखण्यात आणि लागलेली आग वेळेवर विझवून जंगल वाचवण्यात वनविभागाला पूर्णपणे अपयश आले आहे. वणवा नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजनांचा आणि गस्तीचा पूर्णपणे अभाव दिसून येत आहे. वनविभागाच्या या सुस्त आणि निष्काळजी कारभारामुळे निसर्गप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

अनेकदा जंगलात वणवा नैसर्गिकरीत्या लागत नसून, तो काही समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक लावला जातो, असा स्थानिकांचा संशय आहे. त्यामुळे जंगलात वणवा पेटवणाऱ्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत आणि कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी पर्यावरण प्रेमींनी केली आहे. शासनाने आणि वनविभागाने वेळीच ठोस पावले न उचलल्यास, भविष्यात सातपुड्याचे हिरवेगार जंगल केवळ इतिहास जमा होईल, असा इशाराही निसर्गप्रेमींनी दिला आहे.

# महात्मा फुले, डॉ.आंबेडकर सामाजिक समतेचे पुरस्कर्ते : राकेश जगताप



प्रतिनिधी । अमळनेर

**अनिष्ट रूढी–परंपरांविरुद्ध संघर्ष करणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि सर्व भारतीयांना समान हक्क प्रदान करणारे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक समतेचे कट्टर पुरस्कर्ते होते, असे प्रतिपादन पंजाब नॅशनल बँक, अमळनेरचे व्यवस्थापक राकेश जगताप यांनी केले.**

युवा कल्याण प्रतिष्ठान, अमळनेर यांच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी प्रा.डॉ. राहुल निकम आणि प्रा. डॉ. लीलाधर पाटील यांनी प्रभावी निबंध लेखनाविषयी मार्गदर्शन केले. अर्बन बँकेचे संचालक तथा माजी व्हाइस चेअरमन रणजित शिंदे यांनी प्रतिष्ठानच्या आगामी उपक्रमांसाठी आर्थिक सहकार्य जाहीर केले. अशोक बिऱ्हाडे यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले व डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. दिशा संदानशिव, भारती कोळी, माधुरी पाटील, डी. ए.पाटील यांनी महात्मा फुले यांच्यावरील गीत सादर केले. प्रास्ताविक प्रा. अशोक पवार यांनी केले, तर सूत्रसंचालन डी. ए. पाटील यांनी केले. स्पर्धेच्या मोठ्या गटात पुणे, मुंबई, अमरावती, जळगाव, धुळे आदी जिल्ह्यांतील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. शिक्षकांचा सहभागही लक्षणीय होता. लहान गटात अमळनेर तालुक्यातील विविध माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मोठ्या गटात शुद्धोधन मिलिंद बागुल (धुळे) यांनी प्रथम क्रमांक पटकावत एक हजार रुपयांचे बक्षीस मिळवले.

# पिंपळनेरात अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई

प्रतिनिधी । पिंपळनेर

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने राज्यभर सुरू केलेल्या अवैध खाजगी प्रवासी वाहतुकीविरोधातील विशेष मोहिमेंतर्गत पिंपळनेर बसस्थानक परिसरात शुक्रवारी मोठ्याप्रमाणावर संयुक्त धडक कारवाई करण्यात आली.**



एसटी महामंडळ व पिंपळनेर पोलिस प्रशासनाच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या मोहिमेमुळे अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांमध्ये खळबळ उडाली. राज्यात ५ ते १५ जून २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या विशेष १० दिवसीय मोहिमेच्या पार्श्वभूमीवर बसस्थानक परिसरात प्रवाशांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. एसटी महामंडळाच्या महसुलावर परिणाम करणाऱ्या तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेशी अवैध तडजोड करणाऱ्या वाहतूकीस आळा घालण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी या कारवाईदरम्यान संशयित वाहनांची तपासणी करून संबंधितांना नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. एसटी स्थानक परिसरात अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. या संयुक्त कारवाईत धुळे विभागाचे सुरक्षा दक्ष अधिकारी दीपक धात्रक, साक्री आगाराचे आगार व्यवस्थापक सुनील महाले, वाहतूक निरीक्षक प्रफुल पाटील, पिंपळनेर पोलीस स्टेशनचे सोमनाथ पाटील, कपिल पवार, पिंपळनेर वाहतूक नियंत्रक इमरान सय्यद यांच्यासह एसटी महामंडळ व पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मंगरुळ येथे नैसर्गिक शेतीविषयक कार्यशाळा

प्रतिनिधी । नंदुरबार

**तालुक्यातील मौजे मंगरुळ येथे कृषी विभागातील आत्मा योजनेतून नैसर्गिक शेतीशाळेचा ला वर्ग घेण्यात आला. प्रभारी तालुका कृषी अधिकारी व्ही. एन. कोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली नैसर्गिक शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले.**



यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी एम. ओ. कोकणी यांनी उपस्थित २५ शेतकऱ्यांची निवड करुन गट निर्माण करुन त्यांना मित्रकिडींचे नावे दिली. उप कृषि अधिकारी आर.टी. पाटील यांनी बियाणे निवड, खते खरेदी करतांना घ्यावयाची काळजी तसेच बिजप्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. मंडळ कृषी अधिकारी पी. एच. धनगर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना अहिरे, सहाय्यक कृषि अधिकारी यांनी खरीप हंगामातील सापळा पिका बाबत मार्गदर्शन केले. आत्म्याचे बीटीएम चंद्रकांत बागुल यांनी एकात्मिक पीक व्यवस्थापन बाबत मार्गदर्शन केले.

सहाय्यक कृषि अधिकारी, श्रीमती ए. एम. वळवी यांनी आयसीएम टाळी शिकवली. सहाय्यक कृषि अधिकारी, एस. व्ही. पाडवी व एस. ए. वसावे यांनी शेतीशाळा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले व आभार मानले. सदरील नैसर्गिक शेतीशाळेसाठी गावाचे सरपंच कुवरसिंग वळवी, रविंद्र वळवी, तुकाराम पाडवी, गुलाबसिंग वळवी आदी प्रगतशील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. दशपर्णी अर्काचे प्रात्याक्षिक करुन माहिती दिली. तसेच एल निनोबाबत देखील मार्गदर्शन केले.

## पान १ वरुन

**महाराष्ट्र रेल्वे फाटकमुक्त......**

तसेच महानगरांमध्ये रेल्वे मार्गाच्या आजूबाजूला असलेले वाढते शहरीकरण लक्षात घेता अशा भागात गरजेनुसार नागरिकांच्या सुलभ दळणवळणाकरिता पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात यावीत. मान्यता देण्यात आलेल्या ६५ कामांमधील संबंधित रस्त्यांवरील २५ हजार ते १ लाखापर्यंत टीव्हीयू (ट्रेन व्हेईकल युनिट) असलेल्या आणि कमीत कमी भूसंपादन आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. वाढते शहरीकरण लक्षात घेता शहरांमधील ८० रेल्वे पायाभूत सुविधांची कामे नियोजित करण्यात आली आहे. या कामांसाठी संबंधित महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन करण्यात यावी. समितीने नियोजित कामाविषयी पडताळणी करावी. त्यानंतर ते काम महारेल हाती घेईल. ही कामे पूर्ण झाल्यास या भागातील नागरिकांना त्यांच्या मागणीआधीच पायाभूत सुविधा मिळतील, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. हुडकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजय कुलश्रेष्ठ, अपर मुख्य सचिव (नगर विकास) असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, सचिव (नियोजन) शैला ए आदी यावेळी उपस्थित होते. महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल यांनी बैठकीत सादरीकरण केले.

**आठवड्याच्या पहिल्याच दिवशी......**

अर्थव्यवस्थेला फटका बसला आहे. भारतीय बाजारपेठ उघडण्याच्या काही वेळ आधी, दक्षिण कोरियाचा कोस्पी निर्देशांक ८% आणि जपानचा निक्केई निर्देशांक ४.२% ने कोसळला, ज्यामुळे भारतीय गुंतवणूकदारांच्या भावनांवर परिणाम झाला.

**केळी उत्पादक शेतकऱ्यांना......**

पाठविण्यात आले होते. या पथकाने नुकसानीची पाहणी करून आपला अहवालही सादर केला आहे. या अहवालाच्या आधारे पुढील भूमिका आणि सरकारकडे करण्यात येणाऱ्या मागण्यांबाबत निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. जळगाव जिल्ह्यासही वादळी वाऱ्यांचा मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी काढणीवर आलेल्या केळीच्या हजारो हेक्टरवरील केळी बागा अक्षरशः जमीनदोस्त झाल्या आहेत. केळी उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चातून उभ्या केलेल्या बागा काही तासांच्या वादळात उद्ध्वस्त झाल्याने त्यांच्यासमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. अनेक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती स्थानिक स्तरावरून समोर येत आहे.

**होर्मुझ सामुद्रधुनीजवळ......**

मंत्रालय आणि जहाजाच्या मालकाच्या संपर्कात आहे. दरम्यान, मारीवेक्स कारवार येथून ओमानच्या दिशेने निघाले होते, अशी माहिती समोर आली आहे.

**टीएमसीच्या २० नाराज......**

केली आहे. याचबरोबर राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) सहभागी होण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, सुखेंदु शेखर रॉय यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्यासोबत काही खासदारांची बैठक झाल्याचा फोटो समोर आला आहे. या बैठकीत वर्धमान पूर्वच्या खासदार शर्मिला सरकार, हावड्याचे प्रसून बॅनर्जी, कूचबिहारचे जगदीश बसुनिया, झारग्रामचे कालिपद सोरेन आणि बांकुराचे अरूप चक्रवर्ती उपस्थित असल्याचे वृत्त आहे. गेल्या दशकभरापासून राज्यसभेत टीएमसीचा प्रमुख चेहरा म्हणून रॉय यांची ओळख होती.

**बऱ्हाणपूर बाजार समितीत......**

आहेत. अलीकडील नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक बागा जमीनदोस्त झाल्या आहेत. परिणामी बाजारात येणाऱ्या केळीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे. मागणी कायम असताना पुरवठा घटल्यामुळे साहजिकच केळी दराने विक्रमी झेप घेतली आहे. बऱ्हाणपूर बाजार समितीतील आकडेवारीनुसार, त्याठिकाणी गेल्या गुरुवारी केळीला कमाल २३७१ रुपये प्रति क्विंटल दर मिळाला होता. मात्र अवघ्या सहा दिवसांत दरात तब्बल ११८४ रुपयांची वाढ नोंदविली गेल्याने मंगळवारी तिथे केळीचे दर ३५५५ रुपयांपर्यंत पोहोचले. इतक्या कमी कालावधीत झालेली ही वाढ केळी बाजारासाठी महत्त्वाची घडामोड मानली जात आहे. व्यापाऱ्यांकडून दर्जेदार केळीला चांगली मागणी कायम असल्याने सध्या बाजारात तेजीचे चित्र दिसून येत आहे.

# घरबसल्या विवाह नोंदणीची सुविधा; महापालिकेची सेवा ऑनलाईन

प्रतिनिधी । धुळे

**नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणाऱ्या सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने धुळे महापालिकेने विवाह नोंदणी सेवा पूर्णतः ऑनलाईन स्वरूपात सुरू केली आहे.**



या नव्या उपक्रमामुळे नागरिकांना विवाह नोंदणीसाठी महापालिका कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासणार नाही घरबसल्या ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. महापालिकेने विवाह नोंदणी प्रक्रियेतील अर्ज सादरीकरण, कागदपत्रांची पडताळणी, उपस्थितीबाबत सूचना तसेच प्रमाणपत्र वितरण या सर्व प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि कार्यक्षम केल्या आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी ही सेवा धुळे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर, Dhule E-Connect -ppda तसेच संकेतस्थळावरील चॅटबॉट सुविधेद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे, दि. ८ जून २०२६ पासून विवाह नोंदणीसाठी ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य राहणार असून ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. विवाह नोंदणीसाठी अर्जदारांनी प्रथम ऑनलाईन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. त्यानंतर अर्ज व कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर अर्जदारांना प्रत्यक्ष उपस्थितीसाठी दिनांक व वेळ कळविण्यात येईल. निर्धारित दिवशी आवश्यक मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहिल्यानंतर सर्व माहिती योग्य आढळल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

# एसएसव्हीपीएसमध्ये जागतिक पर्यावरण दिन साजरा

प्रतिनिधी । धुळे

येथील एसएसव्हीपीएस विज्ञान महाविद्यालय येथे आज जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. जितेंद्र तलवारे हे होते.

बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल सुदीप मिस्रा यांच्या मार्गदर्शनाने हा उपक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमास मेजर के. एम. बोरसे, मेजर महेंद्रकुमार वाढे आणि कॅप्टन क्रांती पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या निमित्ताने स्थानिक पर्यावरण तज्ज्ञ प्रा. एन. एम. जोशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी पर्यावरण संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि तरुण पिढीने घ्यावयाच्या पावलांवर प्रकाश टाकला.

विविध प्लाटूनमधील निवडक छात्र सैनिक उपस्थित होते. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता सर्व कॅडेट्सनी पुरेशी काळजी घेत हा राष्ट्रीय उपक्रम यशस्वी केला.

# जनगणना २०२७ : पहिल्या टप्प्यात धुळे मनपा राज्यात प्रथम

प्रतिनिधी । धुळे

**देशात आगामी काळात होणाऱ्या जनगणना २०२७ च्या मोहिमेत धुळे महानगरपालिकेने संपूर्ण महाराष्ट्रात बाजी मारली आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील १०० टक्के काम अत्यंत अचूकतेने आणि वेळेपूर्वी पूर्ण करून धुळे मनपाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.**

विशेष म्हणजे, या कामासाठी शासनाने १४ जून २०२६ ही अंतिम मुदत दिली असताना, धुळे मनपाच्या टीमने अविरत प्रयत्न करून ५ जूनच्या सायंकाळपर्यंतच हे काम १००र टक्के पूर्ण करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. धुळे महानगरपालिकेच्या या ऐतिहासिक आणि कौतुकास्पद कामगिरीची दखल राज्य पातळीवर घेण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या प्रमुख जनगणना अधिकारी श्रीमती निरुपमा डांगे यांनी धुळे मनपाचे आयुक्त तसेच जनगणनेच्या कामात अहोरात्र मेहनत घेणाऱ्या संपूर्ण टीमचे विशेष अभिनंदन केले असून त्यांचे कौतुक केले आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा अत्यंत महत्त्वाचा आणि आव्हानात्मक मानला जातो. महानगरपालिका हद्दीत ९०१ एचएलबी म्हणजेच गट हे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी धुळे मनपा आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा, उपयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, जनगणना विभाग प्रमुख, चार चार्ज ऑफिसर, चार्ज लिपिक, सर्व तांत्रिक सहायक, ११७ पर्यवेक्षक आणि ६९० प्रगणक १६ मे पासून युद्धपातळीवर काम करत होते. आयुक्त नितीन कापडणीस यांचा सातत्याचा पाठपुरावा, अचूक व सूक्ष्म नियोजन, दैनंदिन आढावा यामुळेच. दिलेल्या मुदतीच्या नऊ दिवस आधीच, म्हणजेच ५ जून रोजी सायंकाळी धुळे शहराच्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्याची म्हणजेच धुळे मनपा हद्दीतील घर यादींचे अंतिम नोंदणी पूर्ण झाली.

### आयुक्तांकडून टीमचे अभिनंदन

हा बहुमान धुळे महानगरपालिकेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याचा, पर्यवेक्षकाचा, प्रगणकाचा व अधिकाऱ्यांच्या सांघिक कष्टाचे फळ आहे. दिलेल्या मुदतीपूर्वी आणि अचूकतेने काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आम्ही ठेवले होते. जे आमच्या टीमने पूर्ण करून दाखवले. राज्याच्या मुख्य जनगणना अधिकाऱ्यांनी केलेले कौतुक आमच्या संपूर्ण टीमचा उत्साह वाढवणारे आहे.

**आयुक्त, धुळे महानगरपालिका**

धुळे मनपाने मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यात व राज्याच्या प्रशासकीय वर्तुळात मनपा टीमचे जोरदार कौतुक होत आहे. इतर शहरांच्या तुलनेत धुळ्याने घेतलेली ही झेप अत्यंत कौतुकास्पद मानली जात आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१७८१ : जगातील पहिल्या आगगाडीचा जनक जार्ज स्टिफन्सन् यांचा जन्मदिन.

१९६४ : लालबहादूर शास्त्री पंतप्रधान म्हणून शपथविधी.

१८९० : गिरणी कामगारांची रविवारच्या साप्ताहिक सुटीची मागणी मान्य होउन साप्ताहिक सुटी सुरुवात झाली.

# वादळी वारे, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांनी तत्काळ पीक नुकसानीची नोंद करावी : मंत्री रक्षा खडसे

## रावेर, यावलसह मुक्ताईनगरातील शेतकऱ्यांच्या केळीबागा वादळी पावसाने झाल्या भुईसपाट

प्रतिनिधी । जळगाव

**जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जिल्ह्यात झालेल्या वादळी वारे, गारपीट आणि जोरदार पावसामुळे अनेक भागांतील शेतकऱ्यांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषत: पीक विमा उतरवलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीची माहिती विमा कंपनीकडे नोंदविताना अडचणी येत असल्याचे समोर आले आहे.**





या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वाची बैठक घेत कृषी विभागाचे अधिकारी, विमा कंपनीचे प्रतिनिधी तसेच दूरध्वनीवरून आयुक्तांना आवश्यक सूचना दिल्या. शेतकऱ्यांनी आपल्या पिकांच्या नुकसानीची माहिती ऑनलाईन पद्धतीने तात्काळ नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणी करणे शक्य नाही, त्यांनी संबंधित तालुक्यातील विमा प्रतिनिधी किंवा कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून माहिती द्यावी, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

तसेच ज्या शेतकऱ्यांच्या पीक विम्यात क्षेत्र कमी दाखविण्यात आले आहे किंवा ज्यांचे विमा अर्ज रद्द झाले आहेत, अशा प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष पंचनामा करून वास्तविक क्षेत्र ग्राह्य धरण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.सर्व पीक विमाधारक शेतकऱ्यांनी याबाबत तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे यांनी केले आहे.

दरवर्षी रावेर तालुक्यात जून महिन्यात वादळीवाऱ्याने लाखो एकर केळी बागा उद्ध्वस्त होत आहे. याला शासकीय अनास्था कारणीभूत आहे. कारण शेतकऱ्यांचा लागवड केलेला खर्च पूर्ण वाया जात असल्याने दरवर्षी शेतकरी कर्जबाजारी झालेला दिसून येत आहे. यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याची मागणी होत आहे.

## थोडक्यात

### आयएमएचा पर्यावरण रॅलीत सक्रिय सहभाग

**जळगाव ।** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरात आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरण रॅलीमध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) जळगाव शाखेने सक्रिय सहभाग घेतला. अध्यक्ष डॉ. धनंजय बोरोले, डॉ. रागिणी पाटील यांच्या नेतृत्वात डॉ. राजेश पाटील, डॉ. सुमन लोढा, डॉ. सुदर्शन नवाल, डॉ. विनोद जैन, डॉ. हेमंत पाटील, डॉ. नितीन धांडे, डॉ. सुजाता महाजन, डॉ. अविनाश भोसले, डॉ. गिरीश बोरसे, डॉ. निरंजन चव्हाण, डॉ. लीना पाटील, डॉ. सोनाली महाजन, डॉ. सीमा पाटील, डॉ. शितल अग्रवाल, डॉ. पल्लवी राणे, यांनी पर्यावरण रक्षणाच्या विविध संदेशाद्वारे जनजागृती केली.

### श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी व पादुकांचे आगमन

**भुसावळ ।** अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज अन्नछत्र मंडळाच्या पालखीचे तसेच श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पवित्र पादुकांचे भुसावळ येथे आगमन झाले आहे. सोमवार, दि. ८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता प्रभाकर हॉलच्या मागे, सोमाणी गार्डन शेजारी, गार्डन व्ह्यू अपार्टमेंट परिसरात पालखीचे आगमन झाले. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता महाआरतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मंगळवार, दि. ९ जून रोजी पहाटे ५ वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पादुकांचा अभिषेक व पूजाविधी पार पडणार आहे. सकाळी ७ वाजता पालखीचे बोदवडकडे प्रस्थान होणार आहे.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने अविनाश पाटील यांचा गौरव

प्रतिनिधी । जळगाव

**बी दि चेंज फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ वितरण सोहळा रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी साई पालखी निवारा, शिर्डी येथे मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात पार पडला.**



या राज्यस्तरीय सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील गुणवंत, कर्तव्यनिष्ठ आणि समाजाभिमुख शिक्षकांचा त्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी विद्यालय, सिंदखेड (लपाली) ता. मोताळा येथील शिक्षक अविनाश पाटील यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. अविनाश पाटील हे मूळचे बेटावद बुद्रुक, (ता. जामनेर) येथील रहिवासी आहेत. शिक्षक हे समाजाची भावी पिढी घडविणारे खरे शिल्पकार असून त्यांच्या निःस्वार्थ सेवाभावाचा गौरव व्हावा या उद्देशाने बी दि चेंज फाउंडेशनतर्फे दरवर्षी या राज्यस्तरीय पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. यावर्षीचा हा प्रेरणादायी आणि मानाचा सोहळा अध्यात्मिक नगरी शिर्डी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुभेदार मेजर दिनकर पवार, माजी सैनिक अधिकारी अरुण भंडारे, अभिनेत्री निवेदिता पगार, बाबासाहेब कापे, प्रकाश कोळपे, निलेश घोडेचोर तसेच अमृत रोहोम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच संस्थेचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे, सचिव रचना ढोकचौळे आणि विश्वस्त अभिषेक तुपे यांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला.

## सारबेटे येथे आरपीआय अल्पसंख्याक आघाडीच्या शाखेचे उद्घाटन

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील सारबेटे येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) व अल्पसंख्याक आघाडीच्या वतीने शाखा उद्घाटन व पक्षप्रवेश मेळाव्याचे आयोजन उत्साहात करण्यात आले.**



या मेळाव्यात विविध समाजघटकांतील सुमारे २०० कार्यकर्त्यांनी आरपीआय (आ) मध्ये प्रवेश करून पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरपीआय (आ)चे जिल्हाध्यक्ष राजू सूर्यवंशी होते. यावेळी धुळे जिल्हाध्यक्ष प्रभाकर जाधव, जिल्हा कार्याध्यक्ष शशिकांत वाघ, भुसावळचे नगरसेवक रोहन सूर्यवंशी, सामाजिक कार्यकर्ते आबा खंडारे, तालुकाध्यक्ष यशवंत बैसाने आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.चंद्रकांत नेरकर यांनी तर सूत्रसंचालन अरुण घोलप यांनी केले.या मेळाव्यात चंद्रकांत मोरे, प्रा. शामकुमार जाधव, विशाल ब्रह्मे, महेश ब्रह्मे, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## डॉ. गणेश फिरके यांना एम.बी.बी.एस. पदवी प्रदान

प्रतिनिधी । न्हावी, ता.यावल

येथील मूळ रहिवासी सेवानिवृत्त शिक्षक मधुकर धनजी फिरके व सेवानिवृत्त शिक्षिका कल्पना फिरके यांचे सुपुत्र डॉ. गणेश मधुकर फिरके यांनी एम बीबीएस ही पदवी महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स या विद्यापीठामधून वेदांत इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च सेंटर येथून नुकतीच घेतली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## फालीच्या अधिवेशनाचा जैन हिल्स येथे समारोप

### इन्व्होशन सादरीकरणात कोल्हापूरची शाळा तर बिझनेस प्लॅनमध्ये जळगावची अनुभूती प्रथम



प्रतिनिधी । जळगाव

**भविष्यातील कृषी क्षेत्रात नेतृत्व विकसित करण्याच्या मुख्य उद्देशाने स्थापलेल्या फ्युचर ॲग्रिकल्चर लीडर्स ऑफ इंडिया (फाली) अधिवेशनाचा आज समारोप झाला. १ ते ८ जून दरम्यान जैन हिल्स येथे तीन टप्प्यात झालेल्या या अधिवेशनात एकूण १६३ कृषी इन्व्होशन आणि १६३ कृषी बिझनेस प्लॅन विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आले.**

तिसऱ्या सत्रातील इन्व्होशनमध्ये सीताबाई पटवर्धन हायस्कूल (कुरुंदवाड, कोल्हापूर) आणि बिझनेस प्लॅनमध्ये अनुभूती आंतरराष्ट्रीय निवासी स्कूल (जळगाव) या शाळांना प्रथम क्रमांक मिळाला. ८ आणि ९ च्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या उपक्रमात महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशातील २०० पेक्षा जास्त शाळांचा समावेश आहे. या उपक्रमाला जैन इरिगेशनचे सहकार्य लाभले आहे. जळगावच्या अनुभूती स्कूलला दोन पारितोषिक फालीच्या तिसऱ्या सत्रात जळगावच्या अनुभूती इंटरनॅशनल निवासी स्कूलला दोन पारितोषिक मिळवली. इन्व्होशनमध्ये अनुभूतीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नेक्सो बायोपल्गला तिसरा तर बिझनेस प्लॅनमध्ये कार्बोक्रेड कार्बन क्रेडीट अँण्ड सस्टेनबेल ॲग्रीकल्चर प्लॅटफॉर्मला पहिले पारितोषिक मिळाले.

कृषी इन्व्होशन सादरीकरण – प्रथम– सीताबाई पटवर्धन हायस्कूल (कुरुंदवाड, कोल्हापूर), द्वितीय– सरस्वती साधना विद्या मंदिर, शांतीवन (आर्वी, बीड), तिसरा– अनुभूती आंतरराष्ट्रीय निवासी स्कूल (जळगाव), चौथा– महाराजा सयाजीराव विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय (सातारा), पाचवा– अण्णासाहेब कल्याणी विद्यालय (सातारा) तर कृषी बिझनेस प्लॅन – प्रथम–अनुभूती आंतरराष्ट्रीय निवासी स्कूल (जळगाव), द्वितीय–सीताबाई पटवर्धन हायस्कूल (कुरुंदवाड, कोल्हापूर), तिसरा– एम जी शहा विद्यामंदिर (बाहुबली, कोल्हापूर), चौथा– दानोळी हायस्कूल (दानोळी, कोल्हापूर), पाचवा– महाराजा सयाजीराव विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय (सातारा) या शाळांना गौरविले गेले.

फालीचे विद्यार्थी त्रिलोक चौधरी (देवास), श्रावणी अडसरे (नाशिक), प्रिया जरांगे (बीड), सार्थक येवले (पुणे) यांनी या उपक्रमातून काय शिकण्यास मिळाले, त्याबद्दल आपले अनुभव सांगितले. फालीच्या या उपक्रमास जैन इरिगेशनसह गोदरेज ॲग्रोवेट, युपीएल, स्टार ॲग्री, रॅलीज इंडिया, ओमनिवोअर, प्रॉम्पट, एसबीआय फाउंडेशन, अमूल, उज्जीवन, रयत शिक्षण संस्था आणि गांधी रिसर्च फाउंडेशन या कंपन्यांचे सहकार्य लाभले.

## रोटरी आयकॉन म्हणजे सदस्यांनी केलेल्या समर्पित सेवा कार्याचा गौरव : कुलगुरू

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी आयकॉन हे कॉफी टेबलबुक म्हणजे रोटरी सदस्यांनी सातत्यपूर्ण पणे समर्पित भावनेने केलेल्या सेवाकार्याचा हा गौरव आहे, असे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी यांनी प्रतिपादन केले.**



गणपती नगरातील रोटरी सभागृहात झालेल्या प्रकाशन सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट डॉ. राजेश पाटील, सहप्रांतपाल डॉ. अपर्णा भट – कासार, अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर व प्रोजेक्ट चेअरमन प्रदीप खिवसरा यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती. कुलगुरू डॉ.माहेश्वरी यांनी आज २०० पेक्षा जास्त देशात १४ लाखांहून अधिक रोटरी सदस्य शांतता, बंधुभाव, पोलिओ निर्मूलन यासह विविध सेवाकार्य सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून करीत आहे. त्याप्रमाणे रोटरी सदस्यांच्या कार्याचा आढावा घेणारे रोटरी आयकॉन हे पुस्तक व त्याचा हेतू अत्यंत स्तुत्य आहे,असे त्यांनी सांगितले.

## जळगावसह देशभरात आज दिसणार शुक्र–गुरु ग्रहांची महायुती

प्रतिनिधी । जळगाव

**खगोलप्रेमींसाठी मंगळवार, ९ जून २०२६ ची संध्याकाळ अत्यंत खास असणार आहे. सूर्यमालेतील दोन सर्वात तेजस्वी आणि बलाढ्य ग्रह, शुक्र आणि गुरु उद्या एकमेकांच्या अत्यंत जवळ येणार आहेत. खगोलशास्त्रामध्ये या विहंगम दृश्याला ग्रहांची युती असे म्हटले जाते.**



शहरासह संपूर्ण महाराष्ट्र आणि भारतातून ही खगोलीय घटना उघड्या डोळ्यांनी सहज पाहता येणार आहे. जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या नॅशनल जिओग्राफिक संस्थेने आपल्या विज्ञान वृत्तात या अद्भुत खगोलीय घटनेचे कॉस्मिक किस असे अतिशय सुंदर आणि रोमँटिक वर्णन केले आहे. आपण जेव्हा पृथ्वीवरून हे दृश्य पाहू, तेव्हा शुक्र आणि गुरु हे दोन ग्रह अवघ्या १.५ ते १.६ अंश कोणीय अंतरावर दिसतील. जर आपण आपल्या हाताचे लहान बोट डोळ्यांसमोर धरले, तर ते आकाशातील जेवढी जागा व्यापते, साधारण तेवढ्याच अंतरावर हे दोन्ही ग्रह एकमेकांच्या शेजारी चमकताना दिसतील. पश्चिम आकाशात सूर्यास्तानंतर लगेचच, म्हणजे संध्याकाळी ७:३० ते रात्री ८:३० या वेळेत हे विहंगम दृश्य अनुभवता येईल. अंधार पडू लागताच पश्चिम क्षितीजावर मिथुन आणि कर्क राशीच्या दरम्यान हिऱ्यासारखा लखलखणारा शुक्र आणि त्याच्या शेजारी काहीसा पिवळसर रंगाचा भव्य गुरु ग्रह नागरिकांना स्पष्टपणे पाहता येईल. साधारण ८:३० नंतर हे ग्रह क्षितीजाखाली मावळू लागतील, त्यामुळे ७:४५ ते ८:१५ ही वेळ निरीक्षणासाठी सर्वोत्तम असेल.

जळगावमधील सध्याच्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता, उद्या संध्याकाळी आकाश मुख्यत्वे निरभ्र राहण्याची शक्यता आहे, ज्यामुळे या आकाश निरीक्षणात कोणताही मोठा अडथळा येणार नाही. खगोल विश्लेषकांच्या मते, अशा खगोलीय घटनांचे मानवी जीवनावर किंवा राशींवर कोणतेही बरे–वाईट ज्योतिषीय प्रभाव पडत नसतात. हे केवळ केपलरच्या ग्रहांच्या गतीविषयक नियमांचे आणि भौमितिक मांडणीचे एक सुंदर नैसर्गिक गणित आहे. त्यामुळे जळगावकरांनी कोणत्याही अंधश्रद्धेला बळी न पडता, वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून आपल्या गच्चीवरून किंवा मोकळ्या जागेतून या खगोलीय दृश्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ यांनी केले आहे.

## ‘बेरोजगारीचा बालेकिल्ला, आपला जळगाव जिल्हा’ फलकाने वेधले तरुणांचे लक्ष

### • फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामसह विविध सोशल मीडियावर फोटो मोठ्याप्रमाणात होतोय शेअर

प्रतिनिधी । धरणगाव

**‘बेरोजगारीचा बालेकिल्ला, आपला जळगाव जिल्हा’ असा मजकूर असलेला फलक हातात घेऊन उभ्या असलेल्या एका युवकाचा फोटो सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम आणि विविध सामाजिक माध्यमांवर हा फोटो मोठ्याप्रमाणात शेअर केला जात असून, हजारो बेरोजगार तरुण–तरुणी त्यावर आपल्या भावना व्यक्त करत आहेत.**




विशेष म्हणजे, या फलकावरील संदेश केवळ एक पोस्ट किंवा व्हायरल ट्रेंड नसून, तो जळगाव जिल्ह्यासह देशभरातील अनेक तरुणांच्या मनातील अस्वस्थता आणि वास्तव मांडणारा आवाज ठरत असल्याची चर्चा सुरू आहे. ‘हे मी नाही सांगत, चॅट जीपीटी – सांगतंय’ असा उल्लेख फलकावर करण्यात आल्याने त्याकडे अधिक लक्ष वेधले गेले आहे. मात्र, त्या वाक्यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बेरोजगारीबाबत व्यक्त झालेली चिंता आणि संताप आहे.

जळगाव जिल्हा हा कृषिप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. केळी, कापूस, मका, ज्वारी आणि इतर पिकांच्या उत्पादनात जिल्ह्याने वेगळी ओळख निर्माण केली असली, तरी औद्योगिक विकासाच्या बाबतीत अपेक्षित प्रगती झालेली नसल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करतात. उच्च शिक्षण घेऊनही नोकरीच्या शोधात फिरणाऱ्या तरुणांची संख्या वाढत आहे. पदवी, पदव्युत्तर, अभियांत्रिकी, आयटीआय, डिप्लोमा किंवा स्पर्धा परीक्षा यांची तयारी करणारे अनेक युवक वर्षानुवर्षे रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. सरकारी भरती प्रक्रियेतील विलंब, मर्यादित रोजगार संधी, खासगी उद्योगांची कमतरता आणि वाढती स्पर्धा यामुळे तरुणांमध्ये निराशा वाढताना दिसत आहे.

काहींच्या मते, बेरोजगारीचा प्रश्न केवळ सरकार किंवा प्रशासनाचा नाही. उद्योग, शिक्षण व्यवस्था, कौशल्य प्रशिक्षण आणि स्थानिक गुंतवणूक या सर्व घटकांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. जिल्ह्यात नवीन उद्योगधंदे, स्टार्टअप संस्कृती, कृषी प्रक्रिया उद्योग, तंत्रज्ञानाधारित व्यवसाय आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्यास परिस्थितीत सकारात्मक बदल घडू शकतो.

सोशल मीडियावर व्हायरल झालेला हा फलक केवळ काही शब्दांचा संदेश नाही. तो रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो–करोडो तरुणांच्या मनातील वेदना, असुरक्षितता आणि अपेक्षांचे प्रतिबिंब आहे. जळगावच्या विकासाचा आलेख उंचावायचा असेल, तर रोजगारनिर्मिती हा केंद्रबिंदू ठरवावा लागेल, अशी भावना समाजातील विविध स्तरांतून व्यक्त होत आहे. आज एका युवकाच्या हातातील फलक चर्चेचा विषय बनला आहे. पण त्या फलकामागे उभ्या असलेल्या असंख्य बेरोजगार तरुणांच्या डोळ्यातील प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत. शिक्षण घेतलं, संघर्ष केला. आता रोजगार कधी मिळणार?

## गावठी कट्ट्यासह जिवंत काडतूस घेवून दहशत माजविणारा जेरबंद

प्रतिनिधी । जळगाव

**शहरात दहशत माजविणाऱ्या आकाश कैलास दामोधर (वय २४, रा. न्यू फेडरेशन बिल्डींग, पिंप्राळा हुडको) याच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या. त्याच्याविरुद्ध रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

शहरातील पिंप्राळा हुडको परिसरातील प्रल्हाद नगरच्या कंपाऊंटमध्ये संशयित आकाश दामोधर हा गावठी कट्टा घेवून दहशत माजवित असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानुसार दि. ५ जून रोजी सायंकाळी पथकाने सापळा रचून संशयित आकाश दामोधर याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केल्यानंतर त्याने गावठी कट्टयासह दोन जिवंत काडतूस काढून दिले. पोलिसांनी ते जप्त केले आहे.

याप्रकरणी पोलीस अंमलदार राहुल रगडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संशयित आकाश दामोधर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास उपनिरीक्षक संजय शेलार हे करीत आहे.

# वरखेडीत शिवप्रेमींकडून शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याची स्थापना

## आमदार किशोर पाटील यांच्या हस्ते दुग्धाभिषेकासह झाले पूजन



**प्रतिनिधी । पाचोरा**

तालुक्यातील वरखेडी येथे अखंड हिंदुस्थानचे स्वराज्य संस्थापक, महाराष्ट्राचे आराध्य दैवत, क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराजांच्या ६ जून राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत पाचोरा तालुक्यातील वरखेडी येथे बाजारपेठ परिसरात आमदार फंडातून उभारण्यात नियोजित जागेत शिवरायांच्या पुतळ्यासाठी गेल्या एक ते दीड वेषांपूर्वी शिवस्मारक बांधकाम करण्यात आले होते. मात्र शासकीय स्तरांवर लालफितीत परवानग्या अडकल्याने येथे शिवरायांच्या पुतळ्याचे काम ताटकळल्याने शिवप्रमींचा हिरमोड झाला होता. मात्र या चौथऱ्यावर अज्ञात शिवप्रेमींनी ५ जूनच्या मध्यरात्री सुमारास शिवरायांचा अश्वारूढ पुतळा आणून बसविला. सकाळी पहाटे सूर्योदय होताच ही घटना उघडकीस आली आणि चर्चा व मोठी खळबळ उडाली. सदर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा स्थापनेची वार्ता पोलिस प्रशासनाला कळविल्यानंतर पोलिस प्रशासनाची एकच धावपळ आणि पळापळ झाली. बाजारपेठेत काही तासांत पुढील कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिस अधिकाऱ्यांसह पोलिसांचा फौजफाटा दाखल झाला आणि गावात चर्चेला उधाण आले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वरखेडीचे पोलीस पाटील बाळूभाऊ कुमावत यांनी तत्काळ पिंपळगाव हरेश्वर पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याणी वर्मा, बीट हेडकॉन्स्टेबल सदाशिव इंगळे, अमोल पाटील यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. झालेल्या घटनेची माहिती पाचोरा विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव रोहम यांना कळविली असता माहिती मिळताच डी.वाय.एस.पी.रोहम यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. संपूर्ण प्रकरणाची माहिती शिवप्रेमींनी आ.किशोर पाटील यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून संपूर्ण परिस्थितीची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच आ.पाटीलें व मधुकर काटे घटनास्थळी उपस्थित झाले. त्यांनी शिवप्रेमी, महिला व ग्रामस्थांना शांतता राखण्याचे आवाहन केले. त्यानंतर पोलीस प्रशासनाशी चर्चा करून राज्याभिषेक दिनानिमित्त शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन, दुग्धाभिषेक व आरती करण्यास परवानगीची मागणी केली. आ. किशोर पाटील, मधुकर काटे, सरपंच सविताताई सोनवणे, संजय पाटील, लताबाई पाटील पुतळ्याचे दुग्धाभिषेक, पूजन व महाआरती करण्यात आली.

ग्रामस्थांनी प्रशासनाशी सहकार्य करण्याची भूमिका घेतली. तसेच पुतळा उभारणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व शासकीय परवानग्या प्राप्त करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. या प्रसंगी ग्रामस्थांनी आमदार किशोर आप्पा पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव रोहम, सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याणी वर्मा तसेच उपस्थित सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी पुतळा उभारण्यासाठी शासनाच्या विविध विभागांची पूर्वपरवानगी आवश्यक असल्याने या प्रकरणात पोलीस प्रशासनाकडून कायदेशीर चौकशी सुरू आहे. पुतळा स्थापनेमागील वस्तुस्थिती, संबंधित व्यक्तींची भूमिका आणि आवश्यक परवानग्यांचा तपशील तपासल्यानंतर पुढील निर्णय शासकीय नियम व कायदेशीर प्रक्रियेनुसार घेतला जाईल, अशी माहिती प्रशासनातील सूत्रांनी दिली.

## थोडक्यात

### एस.टी.बसच्या वर्धापनदिनानिमित्त ज्येष्ठ प्रवाशांचे केले स्वागत

**यावल ।** एस.टी. बसचा ७८ वा वाढदिवस यावल एस.टी. बसस्थानकात नुकताच साजरा करण्यात आला. यानिमित्ताने आगार प्रमुख दिलीप महाजन यांनी केक कापून ज्येष्ठ प्रवाशांना गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. यावेळी एस.टी.बस सजवून बसचे पूजन ज्येष्ठ प्रवाशी रघुनाथ पांडुरंग महाजन (वय ७८) यांच्याहस्ते करण्यात आले. बसस्थानकात रांगोळी, तोरण, पताका लावून सुंदर लक्षवेधी सजावट करण्यात आली होती.

### पाचोऱ्यात आज स्वामी समर्थ पालखीचे आगमन

**पाचोरा ।** अक्कलकोट येथून निघालेल्या श्री स्वामी समर्थ महाराज पालखी सोहळ्याचे पाचोरा येथे मंगळवार, दि.९ जून रोजी आगमन होणार आहे. गेल्या २५ वर्षांपासून सुरू असलेला हा पालखी सोहळा यंदाही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. पालखी भरत डेअरी स्टॉप येथून कृष्णापुरी, जामनेर रोड, चावडी परिसर, विठ्ठल मंदिर रोड, रथ गल्ली, गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक व शिवाजीनगर मार्गे मार्गक्रमण करणार आहे.

# ऐनपूर येथे जागतिक पर्यावरणदिन साजरा

**प्रतिनिधी । रावेर**



**तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात दि.५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

प्राचार्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. कार्यक्रमात पर्यावरणाचे महत्त्व, वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि जैवविविधतेचे संवर्धन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पर्यावरण जनजागृतीसाठी घोषवाक्ये, पोस्टर प्रदर्शन आणि स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. परिसर स्वच्छ ठेवणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि अधिकाधिक वृक्ष लागवड करणे, याबाबत उपस्थितांना आवाहन करण्यात आले. प्राचार्यांनी आपल्या भाषणात पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असल्याचे सांगून प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# जोगलखेडे येथे जवानाची गळफास घेत आत्महत्या

**प्रतिनिधी । पारोळा**

**तालुक्यातील जोगलखेडे येथील ४२ वर्षीय जवान सुट्टीवर घरी आला असता त्याने दि.६ जून २०२६ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.**



जोगलखेडा येथील संदीप धर्मा पाटील,( ह.मु. गणपतीनगर, पारोळा) हे आय.टी.बी.पी. दलात सैनिक म्हणून कार्यरत आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी पारोळा येथे घर घेतले होते. पारोळा शहरातील गणपती नगरमध्ये त्यांचे वास्तव्य होते. संदीप पाटील हे सध्या सुट्टीवर घरी आलेले होते. दि.५ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास घरात कोणालाही काही न सांगता घरून निघून गेले होते.

नातेवाईकांनी त्यांचा शोधाशोध घेत असताना शहरापासून काही अंतरावर असलेल्या उंदीरखेडा शिवारातील शेतात त्यांनी निंबाच्या झाडाला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यांना पारोळा कुटीर रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. दरम्यान, वीर जवान संदीप पाटील हे आय. टी.बी. पी. दल छत्तीसगड येथे नोकरीस कार्यरत असून त्यांचे हे सेवानिवृत्तीचे शेवटचे वर्ष होते.

माहितीप्रमाणे ते १० दिवसांच्या सुट्टीवर आले होते व आज ते कर्तव्यावर रवाना होणार होते. त्याआधीच त्यांनी आत्महत्या केली. त्यांच्यावर मूळ गावी जोगलखेडा येथे रविवारी दि.७ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. याबाबत गोपाल पाटील यांनी दिलेल्या माहितीवरुन पारोळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून घटनेच्या पुढील तपास पोलीस करीत आहे.

# मराठा सेवा संघातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**प्रतिनिधी । पारोळा**

**मराठा सेवा संघाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला मराठा सेवा संघाचे अध्यक्ष डॉ. शांताराम पाटील, उपाध्यक्ष डॉ.योगेंद्र पवार यांनी माल्यार्पण करुन अभिवादन केले. यानंतर मराठा सेवा संघाचे सचिव प्रा.जे.बी. पाटील यांनी आज राज्याभिषेक सोहळ्याला ३५२ वर्षे होवून ३५३ वर्षात पदार्पण केले.**



आजच्या दिवशी गडांचा राजा रायगडावर हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला. रयतेचे राज्य स्थापन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळ्यांना सोबत घेत स्वराज्य प्रेरक शहाजी महाराज व राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचे स्वप्न साकारले व स्वराज्याला सार्वभौमत्व मान्य झाले. रयतेचे स्वाभिमानानचे, पराक्रमाने हिंदवी स्वराज्याला छत्रपतींचा राज्याभिषेक संपन्न झाला.

राज्यभिषेक सोहळ्याचे वर्णन सभासद बखरीत लिहिले आहे, महाराष्ट्रात पातशहा एवढा छत्रपती जाहला ही गोष्ट सामान्य जाहली नाही. तर इंग्रज अधिकारी हेन्री ऑक्झिंडेन त्याच्या रोजनिशीत लिहितो, राज्याभिषेक सोहळा अत्यंत दिमाखदार, दैदिप्यमान होता. सुवर्ण सिंहासनावर आरूढ छत्रपती शिवाजी महाराज बाजूला अष्टप्रधान मंडळ व सरदार हे राजसत्तेचे प्रतीक व वैभव होते. अशा अभुतपूर्व सोहळ्याला उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले असे लिहून ठेवतो.

आजच्या या कार्यक्रमास सतिश माने, डॉ. मनोहर पाटील, योगेश पाटील, डॉ.डी.एन. सूर्यवंशी, डॉ. आसिफ कुरेशी मयूर भोई, निलेश मराठे, रितेश मराठे व अनेक शिवप्रेमींनी उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराजांना विनम्र अभिवादन केले.

# खान्देशचे रिल्स स्टार रवींद्र भोई यांना 'महाराष्ट्र नायक' राज्यस्तरीय पुरस्कार



**प्रतिनिधी । अमळनेर**

**येथील रहिवासी तथा खान्देशातील प्रसिद्ध रिल्स स्टार रवि बॉडीगार्ड म्हणून ओळख असलेले रवींद्र भोई यांना कला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

बीएसएफ बहुद्देशीय संस्था, संत कबीर बहुद्देशीय संस्था आणि उपेक्षित नायक न्यूज यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रातील सामाजिक, कृषी, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक, प्रशासकीय, कला तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यावेळी गौरव करण्यात आला. रवींद्र भोई हे प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते आमिर खान यांचे पहिले बॉडीगार्ड म्हणून ओळखले जातात. सोशल मीडियावरील त्यांच्या रिल्सना मोठी लोकप्रियता लाभली आहे. इंस्टाग्राम, फेसबुक, मोज आणि युट्यूब या माध्यमांवर त्यांचे लाखो फॉलोअर्स आहेत. चित्रपटसृष्टीतील मान्यवर कलाकारांच्या उपस्थितीत ३१ मे रोजी नाशिक येथे हा भव्य पुरस्कार सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक भूषण सरदार होते.

कला आणि मनोरंजन क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत रवींद्र भोई यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे अमळनेर व खान्देशच्या कला क्षेत्राला राज्यस्तरावर नवी ओळख मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# न्हावी ग्रामपंचायतीकडून पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**प्रतिनिधी । यावल**

तालुक्यातील न्हावी ग्रामपंचायत प्रशासनाकडून पर्यावरणदिनानिमित्त न्हावी ते मधुकर सहकारी साखर कारखाना रस्त्याने वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण ग्रामपंचायत सदस्या सविता गाजरे, हेमांगी झोपे, फातेमा बी तडवी, रूपाली तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी लोकनियुक्त सरपंच देवेंद्र चोपडे, उपसरपंच नितीन इंगळे, जिल्हा दूध संघाचे संचालक नितीन चौधरी, ग्रामपंचायत सदस्य गफ्फार पिंजारी, चेतन झोपे, तुषार साळुंके, रवींद्र तायडे, नदीम पिंजारी, ग्रामपंचायत अधिकारी प्रताप बोदडे, भाजपा फैजपूर मंडळ अध्यक्ष उमेश बेंडाळे, सरचिटणीस किशोर वाणी, अरुण तायडे, विश्वनाथ तायडे, राज्यात तडवी उपस्थित होते.

# चोपड्यात अवैध धंद्यांसह वाहनचालकांवर कारवाई

**प्रतिनिधी । चोपडा**

शहर पोलिसात नुकत्याच आलेल्या पोलीस निरीक्षक पवन कुमार देसले यांनी अवैध धंदे, वाहतूक व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व गुन्हे दाखल करण्याचा चांगलाच सपाटा चालवला आहे.

गेली ५ जून ही तारीख गुन्हेगारांना ब्लॅक डे ठरावी, अशी ठरली आहे.अवैध देशीदारू विक्री करणाऱ्या ७ केसेस तर जुगाराच्या ४ आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे. इतकेच नव्हे अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या दोन जणांना तर रात्री बे-रात्री फिरणाऱ्यांवर बी.पी.ॲक्ट अंतर्गत कारवाई केली आहे .मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ३० वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. यात ट्रिपलसीट, विना लायसन्स, फॅन्सी नंबर प्लेट , रहदारीस अडथळा, दारू पिऊन गाडी चालविणे, अशा एक ना अनेक गुन्हेगारांवर कायद्याचा बडगा चालवून गुन्हे दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे अत्यंत संवेदशील कामगिरी करत एका बेपत्ता महिलेला शोधून काढण्यात यश मिळवले. त्यामुळे अवैध वाहतूक असो वा गुन्हेगार असो यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे .



जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे,अडीशनल एसपी. नखाते व उपविभागीय अधिकारी कोथे यांच्या आदेशनुसार पोनि पवन देसले व टीमने ऑपरेशन ऑल आऊट मोहिम राबवली.

# अमळनेरात श्री अनिरुद्ध उपासना फाऊंडेशनचे जिल्हास्तरीय अधिवेशन उत्साहात

## • अधिवेशनात जिल्ह्यातील ६२ केंद्रांच्या प्रगतीचा घेण्यात आला आढावा

**प्रतिनिधी । अमळनेर**

**श्री अनिरुद्ध उपासना फाऊंडेशन, मुंबई आयोजित जळगाव जिल्हास्तरीय कार्यकर्ता अधिवेशन रविवारी (दि. ७ जून २०२६) छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर, अमळनेर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या अधिवेशनासाठी मुंबईहून सुमारे ३० पदाधिकारी तसेच जळगाव जिल्ह्यातील सुमारे १,००० कार्यकर्ते उपस्थित होते.**




सकाळी १० वाजता प्रार्थनेने अधिवेशनाची सुरुवात झाली. संपूर्ण खान्देशात कार्यरत असलेल्या ४७ श्री अनिरुद्ध उपासना केंद्रांच्या कार्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. तसेच एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून संस्थेच्या विविध उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले.

अधिवेशनात जळगाव जिल्ह्यातील ६२ केंद्रांच्या प्रगतीचा आढावा मांडण्यात आला. संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या रक्तदान शिबिरांची माहिती, विविध समाजोपयोगी सेवा उपक्रम तसेच आपत्ती व्यवस्थापन (डिझास्टर मॅनेजमेंट) अभ्यासक्रमाची माहिती उपस्थितांना देण्यात आली.



पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण उपक्रमांतर्गत ७०० सीड बॉलचे वाटप करण्यात आले. विविध सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमांची माहिती कार्यकर्त्यांना देऊन त्यांना अधिक प्रभावीपणे कार्य करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चाललेल्या या अधिवेशनाच्या समारोपावेळी स्क्रीनवर अभंग सत्संगाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपस्थित असंख्य भक्तांनी भक्तिरसात तल्लीन होत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शांतीपाठानंतर अधिवेशनाची सांगता झाली. हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी श्री अनिरुद्ध उपासना केंद्र, अमळनेरच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.